<u>नियमित दिवाणी दावा क्रं. ५८/२००९ मधील अर्ज (नि.१२५) वरील आदेश</u>

CNR: MHST14-000515-2009

वादीतर्फे दाखल अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुचे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेशीका ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्ती करीता दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठरावाकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादीने दावा मिळकती सदंर्भात दि.०९/०५/१९८८ रोजी झालेला दावा मिळकती संदर्भातील खरेदीदस्त बेकायदेशीर असून तो वादीच्या हिस्स्यावर बंधनकारक नाही, असा जाहीर ठराव होवून मिळावा म्हणून दाखल केलेला आहे. तथापि, प्रस्तुतचा खरेदीदस्त हा प्रतिवादी क्रं.२ व ४ यांच्या दरम्यान झालेला असून तो टंकलेखनातील चुकीमुळे दाव्याच्या विनंती पॅरामध्ये प्रतिवादी क्रं.१ व २ यांचेमध्ये गट नं. ५१२ बाबत दि.०९/०५/१९८८ रोजी झालेला खरेदी व्यवहार हा बेकायदेशीर असून, तो या वादींचे खरेदी हिस्स्यावर बंधनकारक नाही, असा जाहीर ठराव होवून मिळावा व सदरचा खरेदीदस्त रद्द होवून मिळावा, असे टंकलेखीत केले गेले आहे. मुळातच खरेदीदस्त हा प्रतिवादी क्रं.२ व ४ यांचे दरम्यान झालेला असल्यामुळे टंकलेखनामध्ये झालेली चुक दुरुस्त करुन, प्रतिवादी क्रं.१ व २ या शब्दाच्या ठिकाणी दावा कलम ११अ मध्ये प्रतिवादी क्रं.२ व ४ अशी दुरुस्ती करण्यात यावी. सदरची प्रस्तावित दुरुस्ती ही टंकलेखनातील तांत्रिक चुकीमुळे झाली असून, तशी दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. तरी, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी नि.२७ वर वादीचे दुरुस्ती अर्जास म्हणणे देवुन अर्जातील संपुर्ण कथने नाकारली आहेत. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचा पुरावा संपल्यानंतर दाव्याच्या अंतिम युक्तिवादावेळी वादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. अंतिम युक्तिवादावेळी प्रतिवादीच्या वकीलांनी दाव्यातील विनंतीमध्ये झालेली चुक व वादीचा बेजबाबदारपणा न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर वादीने दावा दुरुस्ती अर्ज दाखल केला असून, तो कायदयाने चालण्यास पात्र नाही. सबब, तो नामंजूर करणेत यावा.

४. प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही.एम.महाजन यांनी असा युक्तिवाद केला की, दावा हा अंतिम युक्तिवादासाठी नेमलेला असतांना, कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्ज मंजूर करता येणार नाही. अंतिम युक्तिवादावेळी प्रतिवादीच्या वकिलांनी वादी मागत असलेली दुरुस्ती न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलेनंतर वादीने दुरुस्ती अर्ज दिला आहे. तो कायदयाने चालण्यास पात्र नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली. याउलट, वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.डी.के.रुद्रभट्टे यांनी असा युक्तिवाद केला की, वादी प्रस्तुत अर्जाद्वारे मागणी करत असलेली दुरुस्ती ही टंकलेखनातील दोषामुळे झालेली चुक दुरुस्त करुन मागत आहे. सन १९८८ ला दावा मिळकती संदर्भात झालेला खरेदीदस्त हा प्रतिवादी क्रं.२ व ४ यांच्या दरम्यान झाला असून, या व्यतिरिक्त अन्य कोणताही दस्त सदर दिवशी प्रतिवादी क्रं.१ व २ यांच्या दरम्यान झालेला नाही, ही बाब प्रतिवादी यांना ज्ञात आहे. निव्वळ टंकलेखनामध्ये झालेली दुरुस्ती केल्यामुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी जी दुरुस्ती

मागत आहेत, तो मजकुर वादीने दाखल केलेल्या मुळ दाव्यामध्ये नमुद आहे. निव्वळ वादीने केलेल्या दावा दुरुस्ती प्रतीवर सदरचा मजकुर चुकीचा टंकलेखीत झालेला आहे. तो मजकुर दुरुस्त करुन दाव्यामध्ये समाविष्ट केल्यास, दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही, याउलट न्यायदानास मदतच होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

५. प्रस्तावित दुरुस्ती ही टंकलेखनातील तांत्रिक चुकी संदर्भातील असल्यामुळे दाव्यावर तसेच प्रतिवादीचे बचावावर विपरीत परीणाम होण्याची शक्यता नाही. वादीने मुळ दावा नि.१ मध्ये असलेल्या विनंती पॅरामध्ये वादी आता जी दुरुस्ती मागत आहे, ती समाविष्ट केलेली आहे. तथापि, दावा चौकशीवर लागल्यानंतर वादीने दावा दुरुस्त केला, त्यावेळी दाखल केलेल्या दुरुस्त प्रतिमधील पॅरा क्रं.११ अ मध्ये प्रतिवादी क्रं.२ व ४ याऐवजी प्रतिवादी क्रं.१ व २ असे चुकीचे टंकलिखीत झाले आहे. मुळातच वादी ज्या खरेदीदस्ताबाबत जाहीर ठराव मागत आहे तो खरेदीदस्त प्रतिवादी क्रं.२ व ४ यांच्या दरम्यान झाला असल्यामुळे व तशाच स्वरुपाचा अन्य दस्त प्रतिवादी क्रं.१ व २ यांच्या दरम्यान दि.०९/०५/१९८८ रोजी झालेला नसल्याने वादी मागत असलेली दुरुस्ती मंजूर केल्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. मुळातच प्रस्तावित दुरुस्तीमधील मजकुर हा मुळ दाव्यामध्ये समाविष्ट असल्याने तशी दावा दुरुस्ती केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, कायदेशीर गुंतागुंत टाळण्याकरीता व दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय करण्याकरीता प्रस्तावित दुरुस्ती केल्याने मदतच होणार आहे. तथापि, वादीने मागणी केलेली दुरुस्ती ही अंतिम युक्तिवादावेळी केली असल्यामुळे व ती निव्वळ वादीच्या हलगर्जीपणामुळे व निष्काळजीपणामुळे मागावी लागली असल्यामुळे वादीचा अर्ज मंजूर करत असतांना, वादीवर खर्च लादून अर्ज मंजूर करणे मला उचित वाटते. सदर दाव्याचा न्यायानिर्णय गुणांवगुणावर होणेसाठी अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज (नि.१२५) हा वादीने प्रतिवादी क्रं.१ व २ यांना कॉस्ट रु.१०००/- देण्याचे अटीवर मंजूर करणेत येतो.

२. वादीने नि.१२५ मध्ये प्रार्थीलेली दुरुस्ती कायदेशीर मुदतीत करुन त्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

३. दाव्याची पुढील सुनावणी ही विनाविलंब घेण्यात येईल, याची वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

फलटण

दि. ०४/१०/२०१८.

(व्ही.जे.जाधव.)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, फलटण.